वाचले : १. जिल्हा न्यायालय, नांदेड कार्यालयीन आदेश क्र. आस्था/ब–४(८)/९६८४/२०२५, दिनांक २९.११.२०२५.
२. राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र. रानिआ/नप–२०२५/प्र.क्र.१४/का.६, दिनांक २६.११.२०२५.
३. राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र क्र. रानिआ–२०२५/सुनिका/नप/प्र.क्र.१४/का–६, दिनांक २९.११.२०२५.
४. जिल्हाधिकारी, नांदेड यांचे परिशिष्ठ–२ मधील प्रमाणपत्र दि. ३०.११.२०२५.
५. जिल्हा न्यायालय, नांदेड कार्यालयीन आदेश क्र. आस्था/ब–४(८)/९७०६/२०२५, दिनांक ०१.१२.२०२५.

-----

## – : कार्यालयीन आदेश : –

ज्याअर्थी, जिल्हा न्यायालयाच्या संदर्भात अ.क्र. १ येथे नमूद आदेशान्वये नांदेड जिल्हा न्यायिक विभागातील (१२) नगरपरिषदा अथवा यथास्थिती नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या अनुषंगाने दिनांक २ डिसेंबर, २०२५ रोजी त्या त्या ठिकाणी कार्यरत सर्व न्यायालयांना सुट्टी घोषित करण्यात आली होती,

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र यांच्या संदर्भात अ.क्र. २ व ३ येथे नमूद पत्रानुसार आणि जिल्हाधिकारी, नांदेड यांच्या संदर्भात अ.क्र. ४ येथे नमूद प्रमाणपत्रानुसार (१२) नगरपरिषदा / नगरपंचायतींपैकी मुखेड आणि धर्माबाद येथील निवडणुका दिनांक २ डिसेंबर, २०२५ ऐवजी दिनांक २० डिसेंबर, २०२५ रोजी घेतल्या जाणार असल्याचे कळविण्यात आले आहे,

त्याअर्थी, सर्व संबंधितांना संदर्भांकित निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावणे शक्य होणेस्तव मा. उच्च न्यायालयाचे इंग्रजी पत्र क्र . General(Adm.)/Judl./2007, दिनांक १२.०६.२००७ आणि त्यासोबतचे परिपत्रक दिनांक ११.०६.२००७ अन्वये दिलेल्या निर्देशांनुसार आणि दिवाणी मार्गदर्शक पुस्तिकेच्या प्रकरण ३६ परिच्छेद ७०१ मधील तरतुदींनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून, मी, रा. म. शिंदे, प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड याद्वारे नांदेड जिल्हा न्यायिक विभागातील **मुखेड आणि धर्माबाद** येथील सर्व न्यायालये व त्यांच्या कार्यालयांना **शनिवार, दिनांक २० डिसेंबर, २०२५** रोजी सुट्टी जाहीर करीत आहे. मुखेड व धर्माबाद वगळता अन्य ठिकाणी कार्यरत सर्व न्यायालये व त्यांची कार्यालये शनिवार, दिनांक २० डिसेंबर, २०२५ रोजी नियमित सुरू राहतील.

कार्यरत असलेल्या मुख्यालयाव्यतिरिक्त मुखेड व धर्माबाद येथील मतदारसंघाच्या यादीत नाव असलेले अधिकारी व कर्मचारी यांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी त्यांचे नाव असलेल्या संबंधित मतदार संघात मतदान असलेल्या दिवशी – जर ते आपला मतदानाचा हक्क बजावून कार्यालयात उपस्थित होऊ शकत नसतील तर – त्यांचे नाव असलेल्या मतदार

संघातील मतदानाच्या दिवशी सुट्टी दिली जावी. अशा अधिकारी / कर्मचारी यांना तशा आशयाचा लेखी अर्ज, निवडणुक ओळखपत्राच्या प्रतीसह आपआपल्या कार्यालय प्रमुखासमक्ष सादर करावा तसेच त्यांनी मतदानोपरांत मतदान केले असल्याचे लिखीत पुष्टीकरण संबंधित कार्यालय प्रमुखासमक्ष सादर करावे.

जिल्हा न्यायालय, नांदेड. )
) (रा. म. शिंदे)
दिनांक :१७.१२.२०२५. ) प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड

........

**पृष्ठांकन क्र. आस्था/ब-४(८)/ 10233 /२०२५.**

प्रतिलिपी सविनय -

- मा. महाप्रबंधक साहेब, उच्च न्यायालय, मुंबई – ४०० ०३२.
- मा. प्रबंधक (निरीक्षण-१/२), उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई
- मा. प्रबंधक (प्रशासन), उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर / नागपूर / गोवा / कोल्हापूर.
- मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सर्व जिल्हे.
- मा. जिल्हाधिकारी, नांदेड
- विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड
- पोलीस अधिक्षक, नांदेड
- अधिक्षक, जिल्हा कारागृह, नांदेड
- सहायक संचालक व सरकारी अभियोक्ता, नांदेड
- अध्यक्ष, अभिवक्ता संघ, नांदेड

प्रभारी प्रमुख जिल्हा न्यायाधीश, नांदेड

प्रतिलिपी,

- मा. जिल्हा न्यायाधीश-१, नांदेड / बिलोली / मुखेड / कंधार / भोकर
- मा. जिल्हा न्यायाधीश-२/३, नांदेड
- मा. अतिरिक्त सह जिल्हा न्यायाधीश, नांदेड
- मा. तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१, कंधार
- मा. न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, नांदेड

- मा. दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड / बिलोली / कंधार / जोड न्यायालय, मुखेड / भोकर
- मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, नांदेड
- मा. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नांदेड
- मा. सह / दुसरे / तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, नांदेड
- मा. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, किनवट / माहूर / हिमायतनगर / हदगांव / अर्धापूर / लोहा / देगलूर / नायगांव बाजार / मुदखेड / उमरी / धर्माबाद
- मा. सह / दुसरे / तिसरे / चौथे / पाचवे / सहावे / सातवे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, नांदेड
- मा. सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, बिलोली / मुखेड / कंधार / भोकर / हदगांव / लोहा / किनवट
- मा. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, मुखेड

यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदर आदेश आपल्या अधिनस्थ सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा आणि आदेशाची एक प्रत आपल्या कार्यालयाच्या सूचना फलकावर लावण्याची व्यवस्था करावी. तसेच प्रस्तुत आदेशाची कल्पना आपआपल्या मुख्यालयी कार्यरत अधिवक्ता संघास द्यावी.

प्रति,

- प्रबंधक, जिल्हा न्यायालय, नांदेड
- अधिक्षक, न्यायिक आणि तांत्रिक विभाग, जिल्हा न्यायालय, नांदेड
- सहायक अधिक्षक, वित्त / निरीक्षण / अभिलेख / बांधकाम / संगणक / सांख्यिकी / जडवस्तू विभाग, न्यायासन, जिल्हा न्यायालय, नांदेड
- वरिष्ठ लिपीक, दिवाणी / फौजदारी अपिल विभाग / ग्रंथालय / सर्वसाधारण मुद्देमाल विभाग, जिल्हा न्यायालय, नांदेड
- सदर आदेशाची एक प्रत जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर आणि एक प्रत सूचना फलकावर डकविण्यात यावी.

जिल्हा न्यायालय, नांदेड. )
)
दिनांक :१७.१२.२०२५. )

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, नांदेड.

........